स्थायी समितीच्या **शुक्रवार** दिनांक 13–09–2013 रोजी दुपारी 03–00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री.अविनाश निळकंठ ठाकरे | सभापती |
| 2. | डॉ. प्रशांत रसपाल चोपडा | सदस्य |
| 3. | श्री.राजेश श्रावण घोडपागे | सदस्य |
| 4. | सौ.रीता अशोक मुळे | सदस्या |
| 5. | सौ. वंदना विनोद इंगोले | सदस्या |
| 6. | सौ. ठरावा विकास खोब्रागडे | सदस्या |
| 7. | श्री.किशोर चिधुंजी गजभिये | सदस्य |
| 8. | श्री.सुरेश दामोधर तळवेकर | सदस्य |
| 9. | सौ. भावना संतोष लोणारे | सदस्या |
| 10. | श्री. राहुल सुखदेव तेलंग | सदस्य |
| 11. | श्रीमती मिना दिलीप चौधरी | सदस्या |
| 12. | श्री. देवेंन्द्र महादेव मेहर | सदस्या |
| 13. | श्री. अमान उल्लाह खान व. अब्दुल मजीद खान | सदस्य |
| 14. | सौ. सिमा सुनिल राऊत | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. पुरूषोत्तम नागोराव हजारे | सदस्य |
| 2. | सौ. मायाताई चितांमण इवनाते | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. रविन्द्र कुंभारे, अति. उपायुक्त
2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**सभापतीः–** निगम सचिवांनी अधिका–याच्या उपस्थितीच्या संदर्भात माहिती सादर करावी.

**निगम सचिवः–** अतिरिक्त उपायुक्त रजेवर आहेत. उपायुक्त सिद्दीकी रजेवर आहेत. त्या व्यतिरिक्त कार्यकारी अभियंता जलप्रदाय, लोककर्म, मॅकेनिकल इंजिनिअर, वर्कशाप, मागासवर्गीय, समाजकल्याण अधिकारी, लेखाप्रमुख, नियंत्रण अधिकारी, अतिक्रमण अधिकारी, फायलेरीया, मलेरीया अधिकारी, सहा आयुक्त झोन क्र. 6 आणि झोन क्र. 7 अनुपस्थित आहेत.

**सभापतीः–** या ठिकाणी प्रत्येक अनुपस्थित अधिका–यावर शिस्तभंगाची कार्यवाही ही स्थायी समिती प्रस्तावित करते. आयुक्ताच्या प्रतिनिधींनी या विषयाची नोंद घ्यावी. अनुपस्थित असलेल्या अधिका–यावर शिस्तभंगाची नियमानुसार कार्यवाही करावी.

<u>ठराव क्रमांक 103</u> :– हनुमाननगर झोन क्र.03, क्षेत्रिय कार्यालय नागपूर महानगरपालिका सन 2013–2014 चे अंदाजपत्रकात एकुण तरतुद रु. 701.16 लक्ष ( अक्षरी रु.सात कोटी एक लाख सोळा हजार ) केलेली आहे. प्रभाग समिती ठराव क्र. 4 दिनांक 29/07/2013 अन्वये मा. सदस्यांनी सुचित केलेल्या दुरुस्तीसह मंजुर करण्याचे अधिकार मा. सभापती यांना देण्यात आले. मा. सभापती, प्रभाग समिती यांना दिलेल्या अधिकारानुसार त्यांनी अंदाजपत्रक तयार केले असुन सोबत जोडलेले परिशिष्ट ''अ'' प्रमाणे अंदाजपत्रकास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 104</u> :– नागपूर महानगरपालिका नागपूर अंदाजपत्रक सन 2013–2014 मध्ये सतरंजीपुरा झोन क्र.7 करीता क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत च्या पदाकरीता पताका क्र. 'अ' टाचण तक्त्याप्रमाणे पदनिहाय राशीची तरतुद ठेवण्यात आलेली आहे. सदरहु तरतुदीनुसार महसुल व्यय राशी रु. 232.60 लक्ष व भांडवली व्यय राशी रु. 490.52 लक्ष असे एकुण रु. 723.12 लक्ष ची तरतुद असल्याचे निदर्शनास येत आहे. परंतु सरर्हु अंदाजपत्रकातील पृष्ठ क्र. 167 वर दर्शविण्यात आलेल्या झोन निहाय तरतुदीचे विवरणानुसार सतरंजीपुरा झोन क्र. 7 करीता महसुली व्यय राशी रु. 235.65 लक्ष व भांडवली व्यय राशी रु. 500.76 लक्ष असे एकुण रु. 736.41 लक्ष तरतुद दर्शविलेली आहे. पदनिहाय तरतुदीची राशी रु. 723.12 लक्ष व झोन निहाय वितरण गोषवारा मध्ये नमुद तरतुदीची राशी रु. 736.41 लक्ष या मध्ये फरक रु. 13.29 लक्ष आहे. सदरहु फरक राशीची विभागानी केल्यास महसुल व्यय राशी मध्ये रु. 3.05 लक्ष ची तुट व भाडंवली व्यय राशी मध्ये रु. 10.24 लक्ष च तुट निदर्शनास येत आहे.

चालु आर्थीक वर्ष 2013–2014 करीता सतरंजीपुरा झोन क्र. 7 चे क्षेत्रीय अंदाजपत्रक दि. 13.08.2013 ला प्रभाग समिती समोर मंजुरीस्तव ठेवण्यात आलेले होते. सदरहु अंदाजपत्रक प्रभाग समिती ठराव क्र. 03 दि. 13.08.2013 अन्वये मंजुरी प्राप्त

आहे. (ठरावाची प्रत पताका क्र. 'ब' वर टाचण आहे) सदरहू अंदाजपत्रकांचा विस्तृत तक्ता सुध्दा सोबत टाचण आहे.

अंदाजपत्रकातील महसुली व्यय मधील कार्यात्मक समुह–3 अंतर्गत येणाऱ्या गौण शिर्ष–मलनिस्सारण व सफाई व समार्जन मधील शिल्लक प्रावधान रु. 1.66 लक्ष व कार्यात्मक समुह–3 अंतर्गत येणाऱ्या गौण शिर्ष–रुग्णालय मधील शिल्लक प्रावधान रु. 3.00 लक्ष असे एकुण शिल्लक प्रावधान रु. 4.66 लक्ष कार्यात्मक समुह–3 अंतर्गत येणाऱ्या गौण शिर्ष–मलनिस्सारण च्या प्रावधानात समाविष्ट करणे अशाप्रकारे गौण शिर्ष–मलनिस्सारण चे एकुण नविन प्रावधान रु. 64.14 लक्ष (रु. 59.48 लक्ष + 4.66 लक्ष) होईल सदरहु प्रावधान रकमेचे प्रभाग निहाय वितरण **<u>सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे</u>** प्रस्तावित करण्यात आलेले आहे त्यास मंजुरी प्राप्त होणे गरजेचे आहे.

महसुली व्यय मधील कार्यात्मक समुह–5 अंतर्गत येणाऱ्या गौण शिर्ष–वाचनालय अध्ययन कक्ष सुस्थिती व दुरुस्ती मधील शिल्लक प्रावधान रु. 0.98 लक्ष व कार्यात्मक समुह–5 अंतर्गत येणाऱ्या गौण–शिर्ष प्राथमिक शाळा दुरुस्ती मधील शिल्लक प्रावधान रु. 1.76 लक्ष असे एकुण शिल्लक प्रावधान रु. 2.74 लक्ष कार्यात्मक समुह–5 अंतर्गत येणाऱ्या गौण शिर्ष–माध्यमिक शिक्षण शिर्षच्या प्रावधानात समाविष्ठ करणे अश्याप्रकारे गौण शिर्ष माध्यमिक शिक्षण चे एकुण नविन प्रावधान रु. 6.14 लक्ष (रु. 3.40 लक्ष +रु. 2.74 लक्ष) होईल सदरर्हु प्रावधान प्रभाग क्र. 17 येथील माध्यमिक शाळाची दुरुस्ती व विस्तार करीता खर्च करण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले त्यास स्थायी समितीची मंजुरी प्राप्त होणे गरजेचे आहे.

मा. श्रीमती आभा विजयकुमार पांडे, नगरसेविका प्रभाग क्र. 31–अ यांनी दि. 03. 09.2013 च्या पत्रान्वये केलेली मागणी वर निर्णय घेण्याचे अनुषंगाने प्रभाग समितीनी मंजुर केलेल्या अंदाजपत्रकात पुढील प्रमाणे दुरुस्ती म्हणजे भांडवली व्यय मधील कार्यात्मक समुह–3 अंतर्गत येणाऱ्या गौण शिर्ष–पाणी पुरवठा मधील प्रावधानातील प्रभाग क्र. 31–अ करीता ठेवण्यात आलेले प्रावधान रु. 1.20 लक्ष व सदरहु गौण शिर्ष अंतर्गत शिल्लक शिल्लक प्रावधान रु. 1.20 लक्ष असे एकुण रु. 2.40 लक्ष प्रावधान कार्यात्मक समुह–3 अंतर्गत येणाऱ्या गौण शिर्ष–मलनिस्सारण मध्ये असलेल्या रु. 40.79 च्या प्रावधानात समाविष्ट करणे म्हणजेच अशाप्रकारे गौण शिर्ष–मलनिस्सारण चे एकुण नविन प्रावधान रु. 43.19 लक्ष (रु. 40.79 लक्ष + रु. 2.40 लक्ष) होईल सदरहु प्रावधानातुन प्रभाग क्र. 31–अ करीता रु. 2.20 लक्ष चे प्रावधान ठेवुन सोबत जोडलेल्या प्रभाग निहाय वितरण तक्ता दुरुस्तीसह मंजुरी करीता विचारत घेणे.

अंदाजपत्रकातील महसुली व्यय मधील एकाच कार्यात्मक समुह मध्ये समाविष्ट गौण शिर्ष मध्ये प्रावधानाचे appropriation व भांडवली व्यय मधील एकाच कार्यात्मक समुह मध्ये समाविष्ट गौण शिर्ष मध्ये प्रावधानाचे appropriation प्रस्तावित असल्याने स्थायी समितीच्या मंजुरीस्तव सादर करण्यात येत आहे. तसेच रु. 10.24 लक्ष ची असलेल्या तुट बाबत निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन पद क्र. अे 43835171855 मधून रुपये 1.20 लक्ष पद क्र. अे 43935171956 या पदात वळते करण्यांत येते. उपरोक्त राशी ही प्रभाग क्र. 31/ब करिता देण्यांत येते या दुरुस्तीसह विषयास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 105</u> :– पावसाळयामध्ये सोनेगांव तलावाचे जलपातळीत वाढ होवून अतिरिक्त पाणी सभोवतालच्या वसाहतीत शिरुन वित्तहाणी होते व प्राणहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याला आळा घालण्याकरीता overflow section (900 मि.मी. व्यासाच्या दोन पाईप लाईन) टाकण्याकरीता रु. 48,30,300/– च्या खर्चास मंजूरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 106</u> :– नागपूर महानगरपालिका सन 2013–2014 चे अंदाजपत्रकानुसार क्षेत्रीय कार्यालयाकरीता विविध व्यय शिर्ष अंतर्गत करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय तरतुद रु. 731.23 लक्ष राशीचे मा. सदस्यांचे सुचनेनुसार करण्यात आलेल्या विविध व्यय शिर्ष अंतर्गत आवंटनाच्या प्रस्तावाचा प्रश्न विचारात घेवून मा. सदस्यांनी सूचविल्या प्रमाणे या अर्थसंकल्पात आवश्यक बदल व दुरुस्ती करण्याचे अधिकार मा. सभापती यांना प्रदान करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली. त्या अनुषंगाने क्षेत्रीय कार्यालयाच्या आय–व्ययकामध्ये आवश्यक फेरबदल करण्यात आले असून, प्रस्ताव मंजूरीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 107</u> :– कळमना अग्निशामक स्थानकात, अग्निशमन प्रशिक्षण केंद्राचे बांधकामास्तव स्थापत्य स्वरुपाचे कामाकरीता रु.87,99,292/– व विद्युत ठरावक कामास्तव रु. 5,01,878 आणि वास्तुशिल्पकार यांची निविदा पूर्व प्रक्रिया शुल्क रु. 1,54,517/– असे एकूण 94,55,687/– रकमेच्या प्राकलनास प्रशासकीय मंजुरी प्रदान करणे, तसेच निविदा पूर्व प्रक्रियेच्या कामास्तव म.न.पा. मध्ये नोंदणीकृत प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागार मे. उमेश पाटील, यांची म.न.पा.च्या मंजूर दरावर नेमणुक करणे व या कामास्तव एकूण रकमेच्या निविदा मागवून उपलब्ध तरतुदीपर्यंत कार्यादेश देणे आणि उर्वरित रकमेचे प्रावधानाची तरतुद करण्याच प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 108</u> :– नागपूर महानगरपालिका सन 2013–2014 चे अंदाजपत्रकानुसार नेहरुनगर झोन क्र.5 करीता विविध झोनल पदांतर्गत कामाकरीता समुहानुसार पुनर्विनियोजन करुन अर्थसंकल्पीय तरतुदीचे आवंटन परिशिष्ट ''अ'' आणि ''ब'' नुसार प्रभाग समिती ठराव क्र.3 दि. 26.07.2013 व्दारे मंजुर करण्यात आलेले आहे.

करीता प्रस्तावित ठराव स्थायी समितीच्या सभेत अंतीम मंजुरी प्रदान करण्याबाबतचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 109</u> :– प्रभाग क्र.56–ब अंतर्गत श्री.देशपांडे समर्थनगर यांचे घरापासुन ते ड्रम बिट्स लॉन, रिंगरोड पर्यंत रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याकरिता मंजुर रु. 4999927/– च्या प्राकलनीय खर्चाच्या कामाकरिता निविदा मागविण्यात आल्या असता प्राप्त एकूण पाच निविदापैकी मे. एस.के.

गुरुबक्षानी यांची प्राकलनीय दरापेक्षा 1.02 टक्के प्रतिशत कमी प्रमाणे रु. 4948928/– किंमतीची निम्नतम निविदा स्वीकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 110 :– नागपूर महानगरपालिकेमध्ये कार्यान्वीत ई–गव्हर्नन्स प्रणालीचे सर्व माडयूल्स चा उपयोग सुरु झाल्यामुळे त्यांच्या वापरासाठी 119 संगणक व 25 स्कॅनर कम प्रिंटर ची खरेदी करण्यासाठी रु. 42,27,650/– एवढया राशीचा अंदाजीत खर्चाच्या प्रस्तावास मंजूरी प्रदान करने व ते खरेदी करण्यासाठी निविदा मागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 111 :– स्थायी समिती ठराव क्र. 99 दिनांक 21.08.2013 अन्वये कृत्रीम विसर्जना करीता खालील साहित्यासाठी वार्षीक लघुनिविदा मागविण्यात आल्या असता तीन निविदा प्राप्त झाल्या. वाटाघाटी नंतर मे. श्री एस सोलुशन नागपूर यांनी पुरवठा करण्याची तयारी दर्शविली (1) Inflatable Round Pool, Per Nos रु.52,000/– (2) EPE Foam Sheet, Per Sheet रु.2500/–(3) High Density Polyethene, Per Nos. रु.14,00/– उक्त पैकी प्रत्येकी 97 नग खरेदी करण्यात येतील. संपूर्ण खरेदीवर एकुण रु. 54,22,300/– खर्च होणार असुन तो आय–व्यय पद क्र.606 मधुन भागविण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 112 :– महानगरपालिकेच्या हॉट मिक्स प्लॉन्ट एम.आय.डि.सी. हिंगणा करिता बंद डब्यातील व खुले डांबर बि.पि.सि.ल./आय.ओ.सि.एल/एच.पि.सि.एल. मुंबई कडून डांबर वाहतुक करण्याच्या कामाकरिता मे. नारायणदास अग्रवाल यांची प्राकलनीय दरा पेक्षा 1.786 टक्केनी कमी दराची रु. 3909801.00 राशीची निम्नतम निविदा स्विकृत करुन निविदेस मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 113 :– नागपूर महानगरपालिकेच्या आरोग्य विभागांतर्गत दैनंदिन स्वच्छतेच्या कामात अधिक सुसूत्रत पारदर्शता आणण्याचे दृष्टीने विभागाद्वारे Expression of Intgerset बोलविण्यात आले असता खालील प्राप्त तिन प्रस्ताव व्ही.एन.आय.टी संस्थे मार्फत तपासून घेण्यात आले.

| Sr. No. | Name of the Vendor | Grand total of points achieved (VNIT) |
|---|---|---|
| 1. | M/s Spatial Ideas Web Solutions Pvt. Ltd. Mumbai | 71 |
| 2. | M/s Anudatta Enterprises Nagpur (ATOS) | 67 |
| 3. | M/s Ideal Techno Solutions Nagpur (Star Link Commu) | 15 |

सर्वात जास्त 71 गुण मे. स्पेशल आयडियास, मुंबई यांना मिळाले असून त्यांनी Software development व प्रशिक्षणासाठी रु. 12 लक्ष एक मुस्त खर्च व ऐवजदार सफाई कामकारांच्या मासीक वेतनापोटी होणाऱ्या बचतीच्या 50 टक्के रक्कम भुगतान करण्यास्तव तिन वर्षाकरीता मंजुरी प्रदान करणे तसेच हार्डवेयर इत्यादी वरील खर्च म.न.पा.द्वारे वहन करणे व होणारा खर्च पद क्र. 215 व इतर पदा मधून भागविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रस्तावित विषयास निविदाकारास हा प्रकल्प राबविण्यासाठी तिन वर्षात किती राशी दयावयाची आहे याची कार्यालयाद्वारे या प्रस्तावात स्पष्टता नाही.

म्हणून विषयामध्ये मध्ये नमुद केल्या प्रमाणे बचतीच्या 50 टक्के निधी हा निविदाकारास दयावयाच्या पूर्वी प्रत्येक महिण्याला स्थायी समितीची मान्यता घेणे आवश्यक राहील या सूचनेसह विषयास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 114</u> :— आसीनगर झोन क्र.9 मधील एकात्मिक रस्ते विकास योजने अंतर्गत बांधण्यात आलेल्या रस्त्यांच्या फुटपाथ/डिव्हायडर्स इत्यादीची दुरुस्ती करुन, रंगरंगोटी व्दारे नुतनीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त 19 निविदांपैकी आर.बी.यादव, यांची प्राकलनीय दरांपेक्षा 26.66 प्रतिशत कमी दरांची रु.42,49,141/— रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 115</u> :— वॉर्ड क्र. 90, इमामवाडा चौकात नागनदीवर पूलाचे बांधकामास्तव रु. 2,09,93,305/— रकमेच्या सुधारित प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करणे व या कामाचे मंजूर निविदाकार मे. अबरार अहमद, यांना मंजूर जुन्याच अटी व शर्तीवर रु. 56,04,345/— रकमेचा कार्यादेश निर्गमित करणे तसेच या कामाचा खर्च पद क्र. A4 2101370616 अंतर्गत प्रस्तावित करण्यात आला असल्याने, या आर्थिक वर्षात आवश्यक तरतूद मुक्त करण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 116</u> :— अंबाझरी ओव्हर फ्लो पॉईंट येथे स्वामी विवेकानंद यांचा २० फुट उंच ब्रॉंझ पुतळा तयार करून उभारण्याच्या कामाचे प्राकलन रू. ८५.०० लक्षला प्रशासकीय मान्यता प्रदान करणे व या कामा करिता कला क्षेत्रातील तज्ञ समितीने केलेल्या शिफारसीनुसार मुर्तिकार मेसर्स राम सुतार यांना रू. ८९,२५,०००/— (एकोन नव्वद लक्ष पंचवीस हजार) च्या प्राकलनीय राशीपेक्षा ५ टक्के अधिकची निविदा मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 117</u> :— मा. सदस्यांनी सादर केलेला खालील ठराव मा. सभापती यांनी दिलेल्या निर्देशानुसार निगम सचिव यांनी स्थायी समितीच्या सभेमध्ये वाचून दाखविला व त्यास समितीने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>—: ठराव :—</u>

LFkk;h lferh Bjko Ø- 74 fn- 15@06@2013 P;k LFkk;h lferh lHkse/;s eatwjh iznku dj.;kr vkyh gksrh- Bjko [kkyhy izek.ks vkgs-

^^egkjk"Vª egkuxjikfydk vf/kfu;e 1949] ukxiwj 'kgj egkuxjikfydk ¼fujlu½ vf/kfu;e] 2011 ps dye 68¼2½ vk;qDrkl] LFkk;h lferhP;k ekU;rsus e-u-ik- dk;|k O;frfjDr vU; dk;|k[kkyhy egkuxjikfydsP;k vf/kdkjkapk okij dj.;kl] drZO; fdaok dke dj.;kl vf/kdkj nsrk ;srhy- izLrkfor izdj.kkr egkjk"Vª izknsf'kd fu;kstu o uxj jpuk vf/kfu;e 1966 e/khy dey 53¼8½ e/;s th lq/kkj.kk dj.;kr vkyh vkgs rh ekpZ] 2012 e/;s >kyh vkgs o egkjk"Vª egkuxjikfydk vf/kfu;e 1949 ¼fujlu½ dk;|k 1 fMlascj] 2012 yk ykxw >kY;keqGs egkjk"Vª egkuxjikfydk] dk;|kP;k dye 68¼2½ izek.ks fu.kZ; ?ks.ks ca/kudkjd vkgs vls LFkk;h lferhps er vkgs-

dfjrk egkjk"Vª izknsf'kd fu;kstu o uxj jpuk vf/kfu;ekP;k dye 53] 54] 55 o 56 ;k dyekaP;k izR;k;kstu fdaok foghr dj.;kpk vf/kdkjkO;frfjDr dye 44] 45 ps vf/kdkj lq/nk ;k izLrkokr lekfo"V djko;kl ikfgts gksrs vls LFkk;h lferhl okVrs- Eg.kwu iz'kklukus egkjk"Vª izknsf'kd fu;kstu o uxj jpuk vf/kfu;ekps dye 44] 45] 53] 54] 55 o 56 pk lekos'k d#u o ;k O;frfjDr T;k dyekapk okij djko;kpk vkgs- v'kk loZ dyekapk loZ lekos'kd izLrko LFkk;h lferhleksj 15 fnolkps vkr lknj dj.;kps funsZ'k nsowu fo"k; dk;kZy;kl ijr djrs-

rlsp e-u-ik- iz'kklu egkuxjikfydk dk;|k O;frfjDr ts dqBysgh vU; dk;|kpk dyekapk okij djrs v'kk loZ dk;|kps dye foghr dj.;kpk izLrko lq/nk 15 fnolkps vkr LFkk;h lferh leksj lknj dj.;kps funsZ'k nsrs-**

mijksDr Bjko fn- 15@6@2013 ps LFkk;h lferhr eatwj >kyk ijarw v|kiikosrk iz'klukl LFkk;h lferhus okjaokj funsZ'k nsowu lq/nk Bjkokph o funsZ'kkph vaeyctko.kh dsyh ukgh- ;koj LFkk;h lferhus froz ukjkth O;Dr djhr vkgs- LFkk;h lferhP;k

lHkse/;s >kysY;k Bjkokph ;ksX; vaeyctko.kh gsrqiqjLlj iz'kklu djhr ukgh v'kh LFkk;h lferhP;k lnL;kaph /kkj.kk >kysyh vkgs-

Eg.kwu gh LFkk;h lferh vk;qDrkus vU; dk;|k[kkyhy egkuxjikfydsP;k vf/kdkjkapk okij dj.ks o drZO; ikj ikM.ks] vk;qDrkaP;k Lrjkoj izR;k;ksthr o foghr dsysys loZ vf/kdkj gh LFkk;h lferh jí djrs vkgs-

egkjk"Vª egkuxjikfydk vf/kfu;e 1949] ukxiwj 'kgj egkuxjikfydk ¼fujlu½ vf/kfu;e] 2011 ps dye 68¼2½ vUo;s LFkk;h lferhP;k ekU;rsf'kok; izR;k;ksthr dsysys fdaok foghr dsysys vf/kdkj csdk;nsf'kj vlY;keqGs R;k vUo;s dsysyh loZ dk;Zokgh csdk;nsf'kj fl/n gksrs- ;k iz'kklukP;k >kysY;k pqdheqGs tckcnkj O;Drhoj f'kLrHkaxkph dk;Zokgh izLrkfor d#u foHkkxh; pkSd'kh lq# dj.;kr ;koh vls gh LFkk;h lferh vk;qDrkl funsZf'kr djrs-

सुचक – हस्ता/– श्री. देवेन्द्र मेहर
अनुमोदक – हस्ता/– श्री. किशोर गजभिये
हस्ता/– श्री. राहूल तेलंग
हस्ता/– श्री. सुरेश डी. तळवेकर
हस्ता/– डॉ. प्रशांत चोपडा

श्री प्रशांत चोपडा :– मा.सभापती महोदय, वर्तमानपत्र मे काफी दिनो से बातमी आ रही है, महानगरपालिका की आर्थिक स्थिती खराब है, मैं संबंधित अधिकारी से जानना चाहता हुं कि हमारी पोजीशन खराब है क्या ?

सभापती :– वित्त अधिका–यांनी या विषयी माहिती द्यावी.

कॅफो :– मा.सभापती महोदय, ऑगस्ट 2012 पर्यंत मागच्यावर्षी टोटल रिसीट 343 कोटी 72 लक्ष 44 हजार रूपये झाली होती, यावर्षी एप्रिल,मे,जुन,जुलै आगस्ट अखेरपर्यंत 250 कोटी 51 लक्ष 10 हजार रूपये झाली आहे, टोटल 93 कोटी रूपयांचे डिफरेंस आहे. चुंगीचे उत्पन्न 189 कोटी रूपये प्राप्त झाले होते, परंतु या पांच महिन्यात एल.बी.टी.च्या माध्यमातुन 86 कोटी रूपये प्राप्त झाले आहे. मागच्या वर्षी जलप्रदाय विभागाचे उत्पन्न होते ते महापालिकेच्या फंडात होते. ते 36 कोटीचे उत्पन्न एनईसीएल कडे गेले आहे.

श्री प्रशांत चोपडा :– मा.सभापती महोदय, हम संकट मे नही है, प्रेस की इस बातमी का हमने खंडन करना चाहिये।

सभापती :– वर्तमानपत्राच्या माध्यमातुन वारंवार चर्चा होत आहे कि महानगरपालिकेत विकास कामे थांबलेली आहे, महानगरपालिकेचा डोलारा कोसळलेला आहे काय?

श्री प्रशांत चोपडा :– मा.सभापती महोदय, 70 कोटी रूपये से हम पिछे चलरहे है, ओव्हर ऑल हमारी आर्थिक स्थिती खराब नही है, हमने इस बात का पेपर मे खंडन करना चाहिये।

सभापती :– वर्तमानपत्रात येणा–या बातमीचे खंडन करावयास पाहिजे कि म.न.पा.ची पोजीशन खराब नाही. दुसरे कामाची आवश्यकता आहे काय ? अश्या प्रकारची नोटींग नस्तीमध्ये नसली पाहिजे, आपली आर्थिक परिस्थिती चांगली असेल तर आपण तसे म्हटले पाहिजे. ज्या अर्थी मा.सदस्य तुम्हाला विकास कामाच्या संदर्भात पत्र देतात ते बेकायदेशीर असेल तर नस्ती बनावयास नको, नस्ती बनली आहे तर आपण हे काम करावयास पाहिजे.

श्री प्रशांत चोपडा :– मा.सभापती महोदय, पिछले समय जो बारीश हुई उसकी वजह से रोड की हालत खराब है बिचमे सेंटर की टीम आयी थी, हॉट.मिक्स.प्लॉट के पास लेबर नही है मेरा सूझाव है, यह जो स्थायी समिती के विषय पत्रिका मे काम दर्शाये गये है यह मंजूर होंगे फिर टेंडर को जायेगे, मा.सदस्य मेटल के लिये डांबर के लिये फोन करते है तो कहां जाता है कि विभाग के पास लेबर नही है। इसलिये इन कामो की प्रक्रिया जल्द से जल्द पुरी की जाये। पिछले समय टेंडर अबाउ गये थे, इसप्रकार की स्थिती न पैदा हो।

सभापतीः– या संदर्भात मा.सदस्यांनी देखील चर्चा केली ती नस्ती सुध्दा या ठिकाणी प्रस्तुत करण्याकरिता सांगितले. ती फाईल आली असेल म्हणून मा.सदस्यांनी विषय मांडलेला आहे. अशी परिस्थिती कां निर्माण होत आहे या विषयाचे विवेचन करावे

कार्यकारी अभियंता (प्रकल्प) :– मा.सभापती महोदय, यावर्षी 185 मि.मि. पाउस जुलै व ऑगष्ट महिन्यात पडला आहे. त्यामुळे रस्त्यांचे स्थिती खराब झाली, हॉट.मिक्स.प्लॉटची परिस्थिती कशी हाताळता येईल, याकडे लक्ष दिले, त्याठिकाणी मटेरीअल पाहिजे, टेंडर काढले त्यावेळी  असे लक्षात आले कि एक प्रतिशत बिलो व दोन प्रतिशत अबाउ, आठ ठेकेदारांच्या निविदा आल्या आहेत त्यात ट्रेंड असा दिसत आहे, 2 टक्के बिलो, 1 टक्के अबाऊ असे वेरीएशन दिसत आहे. कुठे तरी काही तरी प्राब्लेम आहे असे वाटत आहे. मागच्या वर्षीच्या टेंडरचा अभ्यास केला असता मागच्या वर्षी 37.86 बिलो होते तर एका टेंडरमध्ये 36 टक्के अबाऊ होते म्हणून निगोशिएशन करीता बोलाविले होते. त्या वाटाघाटीनंतर मागच्यावेळी 2.5 प्रतिशत बिलोला काम दिले होते. महत्वाचा असा मुद्दा आहे. हे दर कमी होवू शकते. रायझिंग जर बघितली तर 45 टक्के रायझिंग होईल असेही म्हणता येणार नाही. याकरिता 7 दिवसाचे शार्ट टेंडर बोलाविण्यात यावे असे मी म्हणत आहे. अशाप्रकारे प्रयास करता येईल. कमी रेट आले तर आपल्याला बचत करता येईल. 40 टक्के पेक्षा बिलो येईल असे वाटत नाही पुन्हा एकदा टेंडर कॉल करावे असे वाटते. तसे आदेश मी दिले आहे.

सभापती :– श्री उराडे साहेब विभागाची काळजी घेतात, याबद्यल मी त्यांचे अभिनंदन करतो, त्यांच्या प्रयत्नानी 35 टक्के पैसे वाचलेले आहे, परंतु या अनुषंगाने 14–02 ला आलेली नस्ती परत 10–09 ला फेरनिविदेला आली, येथपर्यंत त्या नस्तीला येण्यास सात महिन्याचा अवधी लागला आहे, ही चिंतेची बाब आहे, या शहरातील रस्ते बुजविण्याची आवश्यकता असल्यामुळे आपण भरपावसात रस्त्यावरील खडडे बुजविले होते. परंतु अश्या महत्वाच्या फाईलला 7 महिन्याचा डिले झाला याला कोण जबाबदार आहे, सात–सात महिने टेंडर फायनल होत नाही, जाणुनबुजुन फाईलला वेळ लावण्यात येतो यामुळे महानगरपालिकेची वर्तमानपत्रात बदनामी होते. गणपती विसर्जनाच्या संदर्भातील नस्ती स्थायी समितीपुढे त्वरीत सादर करण्यांत येते व टार पॅचेसच्या नस्तीला सात महिन्याचा कालावधी लागतो, या संदर्भात विवेचन सादर करावे.

कार्यकारी अभियंता (प्रकल्प) :– मा.सभापती महोदय, रस्त्यावरील पॉटहोल झालेले आहे तो विषय महत्वाचा आहे, विषय क्रमांक 85 च्या नस्तीच्या संदर्भात 15–08 ला कॅफोनी क्युरी केलेली आहे कि सन 2012–13 च्या तरतुदीनुसार मान्यता देता येणार नाही.

सभापती :– 12.2 ला प्रमुख वित्त अधिका–यांनी फाईलवर लिहिले व 14.2.ला टेंडर तयार झाले, नवीन बजेट सादर न करता अर्थसंकल्पात तरतुद नसतांना येणारी तरतुद लक्षात

घेवुन तरतुद करण्यांत आली. जेणेकरून पावसाळयात जे खडडे होतील ते बुजविण्याकरिता महानगरपालिका सक्षम व्हावी, हा या मागचा उद्येश होता. 16.5.ला आयुक्तांनी प्रशासकीय मान्यता प्रदान केली, तरी सात महिन्याचा पिरीअड संपुर्ण प्रक्रियेला लागला. कोणत्या कामाला प्रायरीटीने करावयास पाहिजे, अश्याप्रकारची भुमिका आपल्याला राबवावयाची आहे काय ? परत टेंडर काढल्यानंतर 10 प्रतिशत अबाउ निविदा आली तर त्याला जबाबदार कोण राहणार आहे. रस्ते नागरिकांच्या दृष्टीने महत्वाचे आहे आपण या विषयाला प्रायरीटी द्यावयास पाहिजे होती. पावसाळयात रस्त्यांची अवस्था खराब झालेली आहे. रस्त्यासारख्या अतिमहत्वाच्या विषयाला 7 महिन्यांचा डिले कशामुळे झाला, पहिल्यांदा डिले झाला तर कॉंट्रक्टरने काम करण्यास मनाई केली, एकीकडे आयुक्तांच्या विरोधात मानहानीचा दावा दाखल केला जातो, समझा सात दिवसानंतर हे टेंडर अबाउ आले तर प्रशासनाची भुमिका काय राहणार आहे. आपण 100 टक्के पी.डब्लू.डी.च्या सीएसआर रेट वर अवलंबून राहतो ? मग तो बदलविण्याचा अधिकार कुणाला आहे. रस्त्याचे काम वेळवर न झाल्यामुळे महापालिकेची मोठया प्रमाणात वर्तमानपत्रात बदनामी झाली आहे. रस्त्यांसारख्या महत्वाच्या प्रश्नावर प्रशासन गंभीर नाही, असे यावरून दिसते. याबाबत अतिरिक्त उप निगम आयुक्त यांनी विवेचन करावे.

अति.उप निगम आयुक्त :– मा.सभापती महोदय, मी. नस्तीचे अवलोकन केलेले आहे. आपण ज्या बाबीच्या संदर्भात याठिकाणी ऊहापोह केलेला आहे. त्याबाबत अशी परिस्थिती निर्माण झाली तर संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून आवश्यक ती कार्यवाही करण्यांत येईल.

सभापती :– अश्याप्रकारच्या निविदेच्या प्रक्रियेमध्ये प्रशासकीय डिले झाल्यामुळे प्रकल्पाची किंमत वाढली असेल तर त्यासाठी जो अधिकारी जबाबदार आहे ज्यांच्यामुळे ही प्रक्रिया डिले झाली व प्रकल्पाची किमत वाढली, अश्या अधिका–याच्या विरोधात कार्यकारी करण्यात यावी.

कार्यकारी अभि.(श्री.उराडे):– मा.सभापती, कंटीन्यु ही नस्ती मुव्हमेंट होत आहे. प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता, टेंडर कॉल या प्रक्रियेला थोडा वेळ लागतो. मागच्या वर्षी टेंडर बिलो आले या वर्षी टेंडर अबाऊ आले. ते 6टक्के अबाऊ होते, 8 टक्के अबाऊ होते.

श्री प्रशांत चोपडा :– मा.सभापती महोदय, वर्तमानपत्र मे जो हमारी महानगरपालिका की बदनामी हुई है, आज रस्तो की हालात खराब होने के कारण शहर मे काफी बडे पैमाने पर अपघात हो रहे है, कल अगर यह काम 10 प्रतिशत अबाउ आया तो इसकी जबाबदारी किस पर रहेगी।

<u>ठराव क्रमांक 118</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

हस्ता/– अविनाश ठाकरे
सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर

हस्ता/– हरिष दुबे
निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर